Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 07 October 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०७ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

मालदिवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईजू भारताच्या दौऱ्यावर आले असून, आज त्यांचं नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात औपचारिक स्वागत करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचं स्वागत केलं. राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईजू आणि पंतप्रधान मोदी यांच्यात आज द्विपक्षीय चर्चा होणार असून, यावेळी उभय देशांमध्ये अनेक सामंजस्य करार होण्याची शक्यता आहे. परस्पर हिताच्या क्षेत्रीय आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा होणार आहे.

****

देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक आज नवी दिल्ली इथं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगणा, ओदिशा आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह, या राज्यांना विकास निधी प्रदान करण्यात सक्रीय सहभाग असलेले पाच केंद्रीय मंत्री देखील या बैठकीला उपस्थित राहतील.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची तीन दिवसांची बैठक आजपासून नवी दिल्लीत सुरू होत आहे. यावेळीही बँकेच्या पतधोरणात बदल होण्याची शक्यता नसल्याचं तज्ज्ञांचं मत असून, अन्नधान्याची महागाई नियंत्रणात ठेवून आर्थिक विकास सुरू ठेवणं हा पतधोरण समितीसाठी चर्चेचा प्रमुख मुद्दा असेल, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. परवा बुधवारी रिझर्व्ह बँक पतधोरण जाहिर करेल.

****

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं पुढच्या वर्षी होणाऱ्या महाकुंभ मेळ्याच्या बोधचिन्हाचं अनावरण काल मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते करण्यात आलं. समुद्र

मंथनातून आलेला अमृत कलश, प्रयागराजचा संगम आणि त्याचं धार्मिक तसंच भौगोलिक महत्त्व राज्यातला या बोधचिन्हातून दर्शवण्यात आलं आहे.

****

मुंबईत कांदिवली इथं 'नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स'च्या स्थापनेसाठी महाराष्ट्र सरकार आणि भारतीय क्रीडा प्राधिकरण यांच्यातल्या महत्त्वपूर्ण सामंजस्य करारावर काल स्वाक्षरी झाली. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या उपस्थितीत हे करार करण्यात आले. प्रस्तावित सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये खेळाडूंकरता आधुनिक वातानूकुलित वसतिगृह, ॲथलीट्ससाठी सेंट्रल किचन आणि डायनिंग, आंतरराष्ट्रीय दर्जाचं नवीन आधुनिक हॉकी टर्फ, मल्टीपर्पज स्पोर्ट्स हॉल इत्यादींचा समावेश असेल.

****

इंदिरा गांधी फेलोशिप अंतर्गत राज्यात कालपासून शक्ती अभियानाला सुरुवात झाली. महिला सशक्तीकरण हे याचं उद्दिष्ट असल्याचं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितलं. मुंबईत टिळक भवन इथं या अभियानाला सुरुवात केल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. हे अभियान जिल्हा, तालुकास्तरावर राबवलं जाणार असून, महिला नेतृत्व पुढे आणणं हा याचा हेतू आहे, असं ते म्हणाले. आगामी विधानसभा निवडणुकीत महायुती सरकार बदलण्याचा जनतेचा विचार आहे, असंही पटोले म्हणाले.

****

मराठी चित्रपटसृष्टीतली पहिली बाल अभिनेत्री आणि पहिली बालगायिका वासंती घोरपडे-पटेल यांचं काल हैदराबाद इथं वार्धक्यानं निधन झालं. त्या १०१ वर्षांच्या होत्या. १९३५ मध्ये प्रभात कंपनीच्या 'धर्मात्मा' चित्रपटातून त्यांनी रुपेरी पडद्यावर पदार्पण केलं. त्यानंतर 'कुंकू' चित्रपटात नायिका शांता आपटे यांच्या सोबत 'भारती सृष्टीत सौंदर्य खेळे' तसंच 'अहा भारत विराजे' ही त्यांनी गायलेली आणि त्यांच्यावर चित्रित झालेली गाणी रसिकांची दाद मिळवून गेली. वामनराव सडोलीकर प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार त्यांना मिळाला होता.

****

नांदेड जिल्ह्यातल्या नऊ विधानसभा मतदारसंघात निवडणुका घेण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. निवडणूक कामासाठी २१ हजार ११५ अधिकारी, कर्मचाऱ्यांची ऑनलाईन नोंदणी पूर्ण झाली आहे. विधानसभेसोबत नांदेड लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक झाल्यास त्यासाठीही प्रशासकीय यंत्रणेने पूर्ण सज्जता

ठेवली आहे. जिल्ह्यात ९ विधानसभा मतदारसंघासाठी ३ हजार ८८ मतदान केंद्र निश्चित करण्यात आले असल्याचं, उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांनी सांगितलं. निवडणुकीच्या अनुषंगाने विविध पथकांची स्थापना करण्यात आली आहे. या कक्षाचे प्रभारी अधिकारी नियुक्त करण्यात आले असून, त्यांना सोपवून दिलेली कामं आणि जबाबदाऱ्याही स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

****

सोलापूर जिल्ह्यात सांगोला तालुक्यात चिंचोली बायपास इथं भरधाव वेगाने जाणार्या कारने पाठीमागून मालट्रकला जोरदार धडक देऊन झालेल्या भीषण अपघातात दोघेजण जागीच ठार तर तिघेजण गंभीर जखमी झाले. कारमधले हे सर्वजण कोल्हापूरचे असून, तुळजापूरहून तुळजाभवानी मातेचं दर्शन घेऊन परत जात असतांना आज पहाटे हा अपघात झाला. जखमींना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

****

नागपूर इथं झालेल्या १७ वर्षाखालील राज्यस्तरीय शालेय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये पुणे विभागाने मुले आणि मुलींच्या दोन्ही गटाचं विजेतेपद मिळवलं. काल झालेल्या अंतिम सामन्यात मुलांच्या गटात अत्यंत चुरशीच्या सामन्यात पुणे संघानं छत्रपती संभाजीनगर संघाचा तीन – एक अशा डावाने, तर मुलींच्या गटात पुणे संघानं कोल्हापूर संघाचा तीन – शून्य असा पराभव केला.

****

मलेशियात होणाऱ्या बाराव्या सुल्तान ऑफ जोहोर चषक हॉकी स्पर्धेसाठी भारताचा पुरुष कनिष्ठ संघ जाहीर झाला आहे. या संघाचा कर्णधार अमिर असून, उपकर्णधार रोहित असेल. तर पी आर श्रीजेश हे मुख्य प्रशिक्षक असतील. भारतीय संघाचा पहिला सामना १९ ऑक्टोबर रोजी जपानशी होणार आहे.

****